पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

वाशिम

● वर्ष १ ●अंक १३२ ● मंगळवार, दि. ६ऑक्टोबर २०२६ ● मूल्य ३ ● पृष्ठे ४

RNI No.- MHAR/ 26 /A4530 Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 Web.http://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

प्रामाणिकपणा
आणि कठोर
परिश्रमाने खरे यश मिळते




# खासदार राहुल गांधी-प्रियंकांचे आकाशवाणी इमारतीपुढे धरणे!

## अखिलेश, अभिषेक बॅनर्जी ताब्यात; ज्ञानेश कुमारांविरोधात इंडिया आघाडी आक्रमक

वृत्तसंस्था ६ ऑक्टोबर

**दिल्ली** : मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी १९ विरोधी पक्षांनी आयोजित केलेला 'लोकशाही वाचवा' मोर्चा पोलिसांनी अडवला. पोलिसांनी ताब्यात घेऊन बसमध्ये बसवल्यानंतर राहुल आणि प्रियंका बसमधून खाली उतरले आणि आकाशवाणीच्या इमारतीत गेले. सध्या ते आकाशवाणीच्या आवारातच धरणे आंदोलन करत आहेत.

निवडणूक आयोगाचे कार्यालय आकाशवाणीपासून अवघ्या २७० मीटर अंतरावर आहे. विरोधकांनी नवीन संसद भवनापासून निवडणूक आयोगाच्या कार्यालयापर्यंत मोर्चा काढला होता. हे आंदोलन गेल्या अडीच तासांपासून सुरू आहे. पोलिसांनी विरोधी पक्षाच्या खासदारांना तीन वेळा अडवले. या झटापटीत हातात तिरंगा ध्वज घेऊन राहुल बॅरिकेड्सवर चढले. त्यांच्या हातात 'ज्ञानेश, इट्स डन ब्रो' असे लिहिलेला फलकही दिसून आला. गेल्या पाच दिवसांत दिल्ली आणि मुंबईत निवडणूक आयोगाविरुद्ध झालेले हे सातवे आंदोलन आहे.



### हा जनादेशाचा अवमान - शिवराज सिंह



शिवराज सिंह चौहान यांनी म्हटले की, हा जनतेने दिलेल्या कौलाचा अपमान आहे. ही भावना लोकशाहीबद्दलच्या चिंतेतून नाही, तर पराभवाच्या नैराश्यातून निर्माण झाली आहे. विरोधी पक्ष जनतेच्या कौलाचा अनादर करत आहे.

विरोधक निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे मोर्चा काढण्यावर ठाम असून सुरक्षा कर्मचाऱ्यांनी 'इंडिया' आघाडीचा मोर्चा नीती आयोगाच्या कार्यालयासमोर अडवला आहे. राहुल गांधी, प्रियांका गांधी वाड्रा आणि इतर विरोधी पक्षनेते पुढे जाण्यावर ठाम आहेत.

'जेन-झी' पिढीशी संवाद साधण्यासाठी राहुल निदर्शनाच्या ठिकाणी 'ज्ञानेश, इट्स डन ब्रो' असे लिहिलेला फलक घेऊन पोहोचले. या लोकसंख्येच्या गटापर्यंत थेट संदेश पोहोचवणे हा त्यामागचा उद्देश होता. आज देशातील दर चार मतदारांपैकी एक मतदार 'जन-झी' पिढीतील आहे. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत १८ ते २९ वयोगटातील मतदारांचे प्रमाण एकूण मतदारसंख्येच्या २२.७८ टक्के इतके होते.

### अधिकार हिरावून घेतले जाताहेत- खरगे



काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितले की, ही चळवळ देशातील तरुण, महिला, शेतकरी आणि गरीब यांच्या अधिकारांशी निगडीत आहे. सत्तेवर टिकून राहण्यासाठी भाजप लोकांचे अधिकार हिरावून घेत आहे आणि निवडणूक प्रक्रियेवर प्रभाव टाकत आहे. ज्या पद्धतीने सत्ता हस्तगत करण्यात आली ती पद्धत अयोग्य होती आणि ही परिस्थिती त्वरित संपवली पाहिजे, असे खरगे यांनी नमूद केले. जनता गप्प बसणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

### संजय राऊत यांची प्रकृती बिघडली!



दिल्लीत निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर राहुल गांधी यांच्या नेतृत्वात विरोधकांचा आक्रमक मोर्चा निघाला आहे. इंडिया आघाडीच्या खासदारांचे जोरदार आंदोलन सुरू आहे. आकाशवाणी भवनाजवळ हा मोर्चा अडवण्यात आला असून राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्यासह अनेक खासदारांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या आंदोलनादरम्यान कडक उन्हाचा त्रास झाल्यामुळे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांना अचानक भोवळ आली. या आंदोलनादरम्यान वातावरण अत्यंत तापले होते. त्यातच खासदार संजय राऊत यांची प्रकृती अचानक बिघडली. उन्हाचा त्रास झाल्यामुळे त्यांना चक्कर आली असता, उपस्थित सहकाऱ्यांनी त्यांना तातडीने सावरले आणि सावलीत नेऊन त्यांच्यावर प्राथमिक उपचार केले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे.

# आणखी 19 तालुक्यांचा दुष्काळ यादीत समावेश!

प्रतिनिधी ६ ऑक्टोबर



मुंबई : राज्यात दुष्काळाची परिस्थिती गंभीर बनली असून राज्य सरकारने आतापर्यंत २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. या तालुक्यांमध्ये शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम सुरू आहे. दरम्यान, २५ सप्टेंबरच्या शासन निर्णयात ७५ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान दाखवण्यात आले आहे, मात्र दुष्काळाच्या निकषात न बसणाऱ्या आणखी १९ तालुक्यांचा फेरविचार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या १९ तालुक्यांचा दुष्काळ जाहीर करण्याबाबतचा प्रस्ताव तातडीने पाठवण्यास सांगण्यात आले असल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.mदत्तात्रय भरणे म्हणाले, 'आपल्या राज्यात २६५ तालुक्यात दुष्काळ जाहीर केला आहे. प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत की, पंचनामे करण्यात यावेत. शेतकरी नुकसान किती झालं आहे याचा आढावा घ्यावा. राज्यात १ कोटी ४९ लाख हेक्टर ६५ लाख २६ हेक्टर जमिनीचे पंचनामे पूर्ण झाले आहेत. बाकी काम देखील सुरू आहे. १० तारखेपर्यंत सर्व पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. महसूल कृषी अधिकारी बांधावर जाऊन पंचनामे करत आहे. विभागनिहाय पाहिल्यास छत्रपती संभाजीनगर विभागात ६८ टक्के पंचनामे पूर्ण झाले आहेत. पुणे विभागात ३० टक्के, तर नाशिक विभागात २२ टक्के पंचनामे पूर्ण झाले आहेत. कोकण विभागात पंचनाम्यांचे प्रमाण सर्वात कमी असल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

### १७ हजार कोटी रुपयांची मागणी

दत्तात्रय भरणे पुढे म्हणाले की, 'दुष्काळ पाहणीसाठी केंद्र सरकारने पथक तयार केले आहे. मुक्तानंद अगरवाल प्रमुख असणार आहेत. पुढील ४ ते ५ दिवसांत महाराष्ट्रात येणार आहेत. जलसंधारण कृषी विभागाच्या माध्यमातून आपण काम करत आहोत. अडचणीच्या काळात शेतकऱ्यांना सोबत आहे. १७ हजार कोटी रुपयांची मागणी आपण केली आहे. केंद्र सरकारने नक्कीच आपल्याला मदत केली आहे, असे त्यांनी म्हटले.

### ३३ लाख महिलांनी अर्ज केलेत

४३ टक्के पंचनामे झाले आहेत. २६५ तालुक्यांव्यतिरिक्त इतर देखील तालुके आम्ही सहभागी करत आहोत. जसे १९ तालुके आम्ही वाढवत आहोत तसेच इतर तालुक्यांबाबत आपण परिस्थिती पाहून निर्णय घेणार आहोत. राज्यात पीक राहिलेले नाही. त्यामुळे मदत मिळणं गरजेचे आहेच. या १९ तालुक्यांचा दुष्काळ जाहीर करण्याबाबतचा प्रस्ताव तातडीने पाठवण्यास सांगण्यात आले आहे.

## »थोडक्यात

### भरधाव डंपरच्या धडकेत एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू

मुझफ्फरनगर : उत्तर प्रदेशातील मुझफ्फरनगर जिल्ह्यातील पुरकाजी पोलीस ठाण्याच्या हद्दीत लक्सर रस्त्यावर सोमवारी रात्री एक अत्यंत भीषण रस्ते अपघात घडला. एका भरधाव डंपरने स्कॉर्पिओ वाहनाला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की स्कॉर्पिओचा चक्काचूर झाला आणि त्यातील प्रवासी आतच अडकून पडले. या दुर्घटनेत एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाला असून अन्य तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. याप्रकरणी पोलिसांनी डंपर चालकाला ताब्यात घेतले असून पुढील कारवाईला सुरुवात केली आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि हायड्रा मशीनच्या साहाय्याने गाडीत अडकलेल्या लोकांना बाहेर काढले.

---

### दुष्काळी २६५ तालुक्यांमधील ३० टक्के पीकक्षेत्राचे पंचनामे पूर्ण!

मुंबई : खरीप हंगामात दुष्काळ जाहीर केलेल्या २६५ तालुक्यांमध्ये पिकाचे पंचनामे सुरू केले असून सोमवारपर्यंत ३२,८२३ पैकी १९,१७९ गावांतील ४५ लाख २३ हजार २४१ हेक्टरवरील पंचनामे पूर्ण करण्यात आले आहेत. एकूण पेरणी क्षेत्राच्या ३० टक्के क्षेत्राचे पंचनामे आतापर्यंत पूर्ण झाले आहेत. ज्या तालुक्यांत ट्रिगर १ लागू करण्यात आला आहे, त्या तालुक्यांतील खरिपाखालील पेरणी क्षेत्र १४९ लाख ५२ हजार ७१२ लाख ३३ हजार हेक्टर आहे.

---

### तुकाराम मुंढेंच्या धडाकेबाज कामगिरीची अमेरिकेतही दखल!

मुंबई : धडाकेबाज आयएएस अधिकारी म्हणून लौकिक असलेले तुकाराम मुंढे हे ज्या विभागात जातात तिथे आपल्या कामाची छाप पाडतात. सध्या अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त असलेल्या तुकाराम मुंढे यांनी भेसळखोरांविरोधात उघडलेल्या मोहिमेमुळे खळबळ उडालेली आहे. तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली एफडीएने गेल्या काही काळात वेगवेगळ्या माध्यमातून भेसळ करून सर्वसामान्यांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांवर जोरदार कारवाई केली आहे. त्यामुळे राज्यभरातून त्यांच्या कामगिरीचं कौतुक होत आहे. आता तर तुकाराम मुंढे यांच्या कामाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवरही घेतली जाऊ लागली आहे.

# अन् मुंबई महापालिका रस्ते पाण्याने धुणार!

प्रतिनिधी ६ ऑक्टोबर

मुंबई : संपूर्ण राज्यात पाणी टंचाई, दुष्काळ असताना मुंबई महापालिका मात्र यंदाही रस्ते पाण्याने धुणार आहे. वायू प्रदूषण कमी करण्यासाठी मुंबईतील ६७७ किमी लांबीचे रस्ते धुतले जाणार आहेत. तसेच रस्ते धुण्यासाठी टँकर भाड्याने घेतले जाणार असून त्यासाठी तब्बल ८.२५ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.

पावसाळा संपून हिवाळ्याची चाहूल लागली की मुंबईतही गेल्या काही वर्षांपासून प्रदूषण वाढू लागते. त्यामुळे गेल्या आठवड्यात मुंबई महापालिका आयुक्त भिडे यांनी आगामी काळातील वायू प्रदूषणाच्या संभाव्य परिस्थितीचा आढावा घेतला.पावसाळ्यानंतर रस्त्यांवर साचलेला गाळ, चिखल आणि धूळ हटविण्यासाठी ऑक्टोबरच्या पहिल्या व दुसऱ्या आठवड्यात स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. प्रमुख रस्ते, दुभाजक, चौक व रस्त्यांच्या कडांची विशेष स्वच्छता करण्यात येणार आहे. आवश्यकता असेल तर पुनर्वापराच्या पाण्याने रस्ते धुणे अथवा पाण्याची सूक्ष्म फवारणी केली जाणार आहे. मुंबईतील वाढते वायू आणि धूळ प्रदूषण रोखण्यासाठी महापालिकेने शहरातील तब्बल ६७७ किलोमीटर लांबीचे ३७७ सार्वजनिक रस्ते दररोज पाण्याने धुण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी जेटिंग व्यवस्थेसह पाण्याचे टँकर भाडेतत्त्वावर घेण्यात येणार असून, १५० दिवसांसाठी सात परिमंडळांत करण्यात येणाऱ्या या कामावर सुमारे ८.२५ कोटी रुपये खर्च होणार आहे. यासंदर्भातील प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे.



महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, शहरातील बांधकामे, पुनर्विकास प्रकल्प, वाहनांचे उत्सर्जन, औद्योगिक उत्सर्जन आदींमुळे वायू प्रदूषण वाढत आहे. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सार्वजनिक रस्त्यांची उच्च दाबाने पाण्याची फवारणी करून नियमित स्वच्छता करण्याचा उपाय करण्यात येणार आहे. या कामासाठी २ हजार, ५ हजार आणि १० हजार लिटर क्षमतेच्या टँकरचा वापर करण्यात येणार आहे. २६ प्रशासकीय विभागांतील टँकरचे सात परिमंडळांत वर्गीकरण करण्यात आले आहे. सातही परिमंडळांसाठी स्वतंत्र कंत्राटदारांची निवड करण्यात आली आहे.

# चरणगाव ग्रामपंचायतीत आर्थिक गैरव्यवहार

## बातमीच्या इम्पॅक्टनंतर ग्रामसेवक जयेश तायडे निलंबित

प्रवीण वानखडे ६ ऑक्टोबर

**अकोला** : चरणगाव ग्रामपंचायतीतील कथित १४ लाख ६५ हजार ५०० रुपयांच्या आर्थिक अपहार प्रकरणात अखेर ग्रामसेवक जयेश तायडे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. अकोला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) अनय नावंदर यांनी सोमवारी, ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी हे निलंबनाचे आदेश जारी केले.

कथित आर्थिक अनियमितता, कर्तव्यात कसूर आणि शासनाची फसवणूक केल्याच्या गंभीर आरोपांवरून ही कारवाई करण्यात आली आहे. याप्रकरणी सरपंच मेघा देशमुख आणि ग्रामपंचायत सचिव जयेश तायडे यांच्याविरुद्ध यापूर्वीच गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर प्रशासकीय कारवाईअंतर्गत तायडे यांच्या निलंबनाची फाईल मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या स्तरावर तब्बल आठ दिवसांपासून प्रलंबित होती. या विलंबाबाबत 'सिटी न्यूज सुपरफास्ट'ने सडेतोड वृत्त प्रकाशित करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते.

बातमी प्रसिद्ध होताच जिल्हा परिषद प्रशासनात जोरदार हालचाली सुरू झाल्या आणि प्रलंबित असलेल्या फाईलवर स्वाक्षरी होऊन जयेश तायडे यांचे निलंबन निश्चित झाले. अशाप्रकारे 'सिटी न्यूज सुपरफास्ट'च्या वृत्ताचा थेट इम्पॅक्ट दिसून आला.दरम्यान, चरणगाव ग्रामपंचायतीतील या १४.६५ लाखांच्या गैरव्यवहारातील निधीचा वापर, बनावट कागदपत्रे आणि या प्रकरणात सहभागी असलेल्या इतर संशयितांची भूमिका यावर आता पुढील चौकशी केंद्रित होणार आहे. या चौकशीत नक्की काय तथ्ये समोर येतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# खेळणाऱ्या चिमुकल्याच्या मानेत टोचले नशेचे इंजेक्शन!



प्रतिनिधी ६ ऑक्टोबर

मुंबई : राज्यात महिला आणि लहानग्यांवरील अत्याचाराच्या घटना काही कमी होताना दिसून येत नाहीत. त्यातच, ड्रग्जमुक्त महाराष्ट्र अभियान बाळगलेल्या महाराष्ट्रात, मुंबईत नशेली पदार्थांची विक्री, आणि सेवन सहजपणे होत असल्याचे दिसून येते. कारण, घाटकोपरच्या बर्वेनगर मध्ये नशेखोरांनी १२ वर्षीय विद्यार्थ्यांच्या मानेत नशेचे इंजेक्शन टोचल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. यश चौरसिया असे विद्यार्थ्याचे नाव असून तो बर्वेनगर मधील महापालिकेच्या शाळा क्रमांक ३ मध्ये शिक्षण घेत असल्याची माहिती आहे. शाळेच्या समोरील मैदानात मित्रांसह खेळत असताना इथे नशा करण्यास बसणाऱ्या सहा ते सात जणांनी त्याच्या मानेत मागून येऊन एक इंजेक्शन टोचले.

त्यामुळे, यशला थोड्या वेळात चक्कर आणि ताप आला आणि तो जाग्यावरच खाली बसला. यश खाली बसल्यावर स्थानिकांनी त्याच्या घरच्यांना हे कळविले आणि कुटुंबाने त्याला जवळील पालिकेच्या मुक्ताबाई रुग्णालयात उपचारांसाठी दाखल केले. सध्या या प्रकरणात पोलीस मुलाचा जबाब नोंदवित असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, या घटनेने घाटकोपरमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# शेतकऱ्यांची पोरं रस्त्यावर आणि मंत्री स्विमिंग पूलमध्ये!

## जरांगे पाटलांचा घणाघाती हल्ला; फडणवीसांनाही दिला इशारा

प्रतिनिधी ६ ऑक्टोबर

**पुणे** : गरिबांची लेकरे आज आपल्या मागण्यांसाठी रस्त्यावर बसली आहेत. ज्या विद्यार्थ्यांच्या मागण्या रास्त आहेत, त्यांच्यासोबत आम्ही खंबीरपणे उभे आहोत, असे मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले. पुण्यात एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला भेट दिल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या आंदोलनाला आपला पाठिंबा असल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले. राज्य सरकारवर आणि मंत्र्यांवर टीका करताना जरांगे पाटील म्हणाले, सरकारने तरुणांना रस्त्यावर बसायची वेळ आणली आहे. सरकारचे मंत्री फक्त दौरे करत आहेत, स्विमिंग पूलमध्ये पोहतात आणि बांधावर जाऊन दुःखावर मीठ चोळतात. शेतात पाणी नाही, पोरांना नोकरी नाही आणि शिक्षक भरतीचा पत्ता नाही. दुष्काळात ५० किलोमीटरवर चारा छावण्या टाकल्या आहेत, मग जनावरांनी काय करायचे? उद्योगपतींचे कर्ज माफ होते, मग ज्या शेतकऱ्यांमुळे तुम्ही खुर्चीवर बसलात त्यांचे कर्ज सरसकट का माफ करत नाही? असा सवाल त्यांनी केला. 'शेतकऱ्यांचा पीक विमा थकला आहे. सरकारने प्रतिहेक्टरी १ लाख रुपयांची मदत करावी, अन्यथा पूर्ण महाराष्ट्र ओसाड पडलेला दिसेल,' असा इशारा त्यांनी दिला. तसेच 'दोन दिवस दोन घास नाही मिळाले तरी चालतील, पण कोणत्याही शेतकऱ्याने आत्महत्या करू नका,' असे कळकळीचे आवाहन त्यांनी केले.



### माझ्या जवळच्या लोकांना उचलले जात आहे

आपल्या कार्यकर्त्यांवर होणाऱ्या कारवाईवर बोलताना ते म्हणाले, मी फुटत नाही, म्हणून माझ्या आसपासच्या लोकांना धरले जात आहे. जे बोलत आहेत त्यांना उचलले जात आहे. गेल्या १५ दिवसांत माझ्या जवळचे कुठे गेले हे मला कळलेच नाही. आरोपांवर बोलताना जरांगे म्हणाले की, गावातील लोकांबद्दल मी काही बोलणार नाही. आपण संयम बाळगायचा आहे, एक दिवस त्यांना पश्चात्ताप होईल. तरुणांनी महिलांविषयी बोलताना विचार करून बोलले पाहिजे.

# आरोग्य सेवक भरती प्रकरणात ट्विस्ट

प्रतिनिधी ६ ऑक्टोबर

**अकोला** : अकोला जिल्हा परिषद आरोग्य सेवक भरतीत नोकरी लावून देण्याच्या नावाखाली उमेदवारांकडून लाखो रुपयांची वसुली केल्याच्या प्रकरणात आता एक नवी आणि खळबळजनक माहिती समोर आली आहे. या प्रकरणात पैसे उकळल्याचा संशय असलेला संबंधित कर्मचारी सध्या माध्यमिक शिक्षण विभागात कार्यरत असून, त्याने आता उमेदवारांचे पैसे टप्प्याटप्प्याने परत करण्यास सुरुवात केल्याची माहिती 'सिटीन्यूज सुपरफास्ट 'ला मिळाली आहे. या भरती प्रक्रियेत आरोग्य सेवक पदासाठी एका उमेदवाराकडून तब्बल १४ लाख रुपयांची मागणी करण्यात आल्याचा गंभीर आरोप झाला होता. त्यापैकी काही रक्कम आगाऊ ( ॲडव्हान्स) म्हणून उकळण्यात आली होती. व्यवहार न जमल्याने अथवा प्रकरण अंगलट येण्याच्या भीती पोटी यातील काही रक्कम आधीच परत करण्यात आल्याचे समजते; मात्र उर्वरित रकमेवरून वाद कायम होता. आता या संपूर्ण प्रकरणात संबंधित कर्मचाऱ्याकडून घेतलेली रक्कम हळूहळू परत केली जात असल्याने प्रशासकीय वर्तुळात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे. पैसे परत करून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न सुरू आहे की काय, असा संशय व्यक्त केला जात असून, या वसुली प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषीवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

### पैसे घेणारा कर्मचारी टप्प्या टप्प्याने रक्कम करतोय परत



# महाराष्ट्रावरील कर्जाचे वास्तव

मार्च २०२६ अखेरपर्यंत महाराष्ट्र मधील एकूण कर्ज अंदाजे ९ लाख ३२ हजार कोटी रुपयांवर पोचले. गेल्या पाच वर्षांत, महाराष्ट्र सरकारचे एकूण थकीत कर्ज सुमारे ५.४८ लाख कोटी रुपयांहून २०२६-२०२७ साठी अंदाजित ११.०२ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. वर्ष २०२१-२०२२ मध्ये शासनाने एकूण ९०,५८७ कोटी रुपये,२०२२-२०२३ मध्ये शासनाने एकूण १,२०,८४१ कोटी रुपये,२०२३-२०२४ मध्ये शासनाने एकूण कोटी रुपये,२०२४-२०२५ मध्ये शासनाने एकूण १,४३,६३५ कोटी रुपये २०२५-२०२६ साठी नवीन कर्जातून सुमारे १,९३,७२३ कोटी रुपये उभारण्याचा प्रस्ताव होता.

केवळ जुन्या मुद्दलाची परतफेड करण्यासाठी राज्य सरकार दरवर्षी मोठ्या प्रमाणात अर्थसंकल्पात तरतूद करावी लागते. २०२१-२२ मध्ये कर्ज परत फेडीवर ४०,१५८ कोटी रुपये,२०२२-२३ मध्ये कर्ज परत फेडीवर ४१,६८९ कोटी रुपये,२०२३-२४ मध्ये कर्ज परत फेडीवर ४८,५७८कोटी रुपये,२०२४-२५ मध्ये कर्ज परत फेडीवर ५६,७२७ कोटी रुपये,२०२५-२६ मध्ये कर्ज परत फेडीवर ६२,०३१ कोटी रुपये, आणि २०२६-२०२७ मध्ये तो ७०,०५५ कोटी रुपयांहून अधिक वाढण्याचा अंदाज आहे.

महाराष्ट्र शासन विविध स्रोतांकडून हे कर्ज उभे करते. कर्जाचा मोठा हिस्सा, सुमारे ७५ टक्के ते ८० टक्के खुल्या बाजारातून रोखे (बॉंड) विकून गोळा केला जातो. केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या विशेष विकास व अल्प मुदतीचे कर्जाचे प्रमाण साधारणपणे ६ टक्के ते ९ टक्के दरम्यान असते.महाराष्ट्र सरकारच्या एकूण कर्जाच्या आणि उत्तरदायित्वाच्या रचनेमध्ये विविध वित्तीय संस्था आणि राष्ट्रीयीकृत बँकांकडून मिळणारे कर्ज (अंतर्गत कर्ज) आणि राज्य भविष्य निर्वाह निधी यांचा वाटा एकत्रितपणे सुमारे २० टक्के ते २५ टक्केच्या दरम्यान असतो.राज्याला मिळणारा महसूल उत्पन्न आणि केंद्राकडून येणारा हिस्सा यातून दरवर्षी कर्जाचे व्याज आणि हप्ते फेडले जातात.दरवर्षी कर्जाचे व्याज फेडण्यासाठीच राज्याला सरासरीने ६५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करावा लागतो. पण या घेतलेल्या कर्जावर जुलै २०२६ मध्ये नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कॅग) यांनी प्रकाशित केलेल्या अहवालात गंभीर आक्षेप घेतले असून,त्यात राज्य सरकारने प्रमुख आर्थिक दायित्वे लपवली आणि कायदेशीर देखरेखीला बगल दिली,असे नमूद केले आहे. महाराष्ट्र शासनाची अर्थसंकल्पाबाहेरील कर्जे म्हणजे राज्य मालकीच्या महामंडळांनी मुख्य सरकारी अर्थसंकल्पाऐवजी घेतलेली कर्जे, नियमित अर्थसंकल्पीय कागदपत्रांमध्ये दिसत नाहीत.३१ मार्च २०२५ पर्यंत एकूण लपविलेले कर्ज (ऑफ बजेट डेट) २८,३२५ कोटी रुपयांवर पोहोचले. त्यात मुख्य कर्जदार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने केवळ २०२४-२५ मध्ये जमीन आणि रस्त्यांच्या कामांसाठी १८,४४० कोटी रुपये उभारले.

राज्याने दावा केला की त्यांची वित्तीय तूट (उत्पन्न आणि खर्चातील तफावत) सकल राज्य देशांतर्गत उत्पादनाच्या २.७४ टक्के होती.कॅगनुसार खरी तूट ३.२० टक्के होती, जी वित्तीय जबाबदारी आणि अर्थसंकल्प व्यवस्थापन कायद्याने निर्धारित केलेल्या ३ टक्काच्या सुरक्षित मर्यादेचे उल्लंघन करते. राज्याने कर्जावरील व्याज आणि मुद्दल परतफेडीवर २,००० कोटी रुपयांहून अधिक खर्च केला. या खर्चाची नोंद नियमित खर्च (महसूल खर्च) म्हणून करण्याऐवजी गुंतवणूक (भांडवली खर्च) म्हणून केली. यामुळे कोणतीही नवीन मालमत्ता तयार झाली नाही, तरीही विकास कामावर जास्त खर्च झाल्याचे कागदावर भासवले गेले.या चुकीच्या नोंदीमुळे राज्याची महसुली तूट प्रत्यक्षात होती त्यापेक्षा कमी दिसली. राज्याने पैशांचा योग्य वापर करण्याऐवजी हजारो कोटी रुपये व्हर्च्युअल पर्सनल डिपॉझिट अकाउंट्समध्ये जमा करून ठेवले.

कॅग अहवालानुसार वाढते सार्वजनिक कर्ज आणि लपविलेले कर्ज यामुळे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर आणि व्याज भरण्याच्या क्षमतेवर गंभीर परिणाम होत आहे.वित्तीय लेखाजोखानुसार ३१ मार्च २०२५ पर्यंत महाराष्ट्राचे अधिकृत कर्ज ८.५९ लाख कोटी रुपये दाखवले गेले होते. मात्र, कॅगने जेव्हा यात २८,३२५ कोटी रुपयांचे लपविलेले कर्ज जोडले, तेव्हा राज्याचे एकूण वास्तव कर्ज ८.८७ लाख कोटी रुपयांवर पोहोचले. लपविलेले कर्ज जोडल्यानंतर राज्याचे एकूण दायित्व राज्याच्या उत्पन्नाच्या १९.५८ टक्के इतके झाले आहे. तसेच राज्य विधिमंडळाच्या माहितीनुसार, वेगवेगळ्या महामंडळांना सरकारने दिलेल्या एकूण हमींमुळे राज्यावरील भविष्यातील कर्जाचा बोजा गंभीर बनत आहे. कर्ज वाढल्यामुळे राज्याला दरवर्षी द्याव्या लागणाऱ्या व्याजाचा बोजा अत्यंत वेगाने वाढत आहे. कॅगच्या निरीक्षणानुसार, राज्याच्या एकूण महसुली जमापैकी तब्बल ६३.४५ टक्के हिस्सा हा केवळ बांधील खर्च (कमिटेड एक्सपेंडिर) म्हणजेच सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार, पेन्शन, सबसिडी आणि वाढलेले व्याज भरण्यातच खर्च होत आहे. महसुलातील ६३ टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम आधीच्याच दायित्वांवर खर्च होत असल्यामुळे, राज्याकडे पायाभूत सुविधा,आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या नवीन विकासकामांसाठी अत्यंत मर्यादित निधी शिल्लक राहत आहे. वाढते व्याज भरण्यासाठी आणि दैनंदिन खर्च भागवण्यासाठी सरकारला पुन्हा नवीन कर्ज काढावे लागत आहे, ज्यामुळे राज्य कर्जाच्या दुष्टचक्रात अडकण्याचा धोका निर्माण झाला आहे.

यंदाच्या वर्षी महाराष्ट्रात ३५८ पैकी २६५ तालुक्यांमध्ये (सुमारे ७४ ते ७५ टक्के तालुक्यांमध्ये) दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे.सरकारी तिजोरीवर सुमारे ४५,००० कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक बोजा पडण्याचा प्राथमिक अंदाज वित्त विभागाने वर्तवला आहे. जरी महाराष्ट्र सरकारने केंद्राकडे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (एनडीआरफ) अंतर्गत विशेष आर्थिक पॅकेजची मागणी केली तरी एनडीआरफ नियमावली अंतर्गत केंद्र सरकार केवळ पिकांचे नुकसान आणि तातडीच्या दुष्काळी उपायांसाठीच निधी मंजूर करते,व तो निधी जास्तीत जास्त ६,००० कोटी रुपयांचा असू शकतो. त्यामुळे राज्य सरकारला केंद्राच्या परवानगीने कमीतकमी ४०,००० कोटी रुपयांचे अतिरिक्त कर्ज उचलावे लागणार आहे. एकंदरीत,महाराष्ट्राच्या वाढत्या कर्जाच्या आणि महसुली तुटीच्या पार्श्वभूमीवर कॅगने राज्याला संभाव्य 'कर्जाच्या सापळ्यातून' बाहेर काढण्यासाठी वास्तववादी अर्थसंकल्प तयार करण्याचा सल्ला दिला आहे.सरकारने केवळ घोषणा न करता राज्याच्या प्रत्यक्ष महसुली जमा आणि खर्चाचा योग्य ताळमेळ ठेवून वास्तववादी अर्थसंकल्प तयार करावा,पुरवणी मागण्यांचे प्रमाण कमी करून बजेटचे अचूक नियोजन करावे, अर्थसंकल्पबाह्य कर्ज घेणे बंद करावे,सरकारने विविध महामंडळांच्या माध्यमातून घेतलेले हजारो कोटी रुपयांचे छुपे कर्ज अधिकृत अर्थसंकल्पात दाखवले पाहिजे व वित्तीय नियमांच्या बाहेरील कर्जांवर अवलंबून राहणे मर्यादित करावे जेणेकरून भविष्यातील परतफेडीचा ताण कमी होईल,असे सुचविले आहे. तसेच मध्यमकालीन वित्तीय महसुली तूट कमी करण्यासाठी आणि भांडवली गुंतवणुकीसाठी आर्थिक जागा निर्माण करण्यासाठी सरकारने मध्यमकालीन वित्तीय एकत्रीकरण आराखडा तयार करावा व विविध विभागांच्या वैयक्तिक ठेव खात्यांमध्ये किंवा बँकेत पडून असलेला विनावापर निधी तात्काळ राज्याच्या मुख्य संचित निधीत जमा करावा, ज्यामुळे महसुली तूट कमी दाखवण्यास मदत होईल. महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व आणि बजेट व्यवस्थापन कायद्यांतर्गत ठरवून दिलेल्या ३ टक्के वित्तीय तुटीच्या मर्यादेचे काटेकोरपणे पालन करावे. केवळ लोकप्रिय घोषणा किंवा कल्याणकारी योजनांवर अवाजवी खर्च करण्याऐवजी, राज्याला महसूल मिळवून देणाऱ्या उत्पादनक्षम मालमत्ता आणि पायाभूत सुविधांच्या विकासावर खर्च वाढविणे आवश्यक ठरते.

**प्रा डॉ संजय खडक्कार,**
माजी तज्ज्ञ सदस्य,
विदर्भ वैधानिक विकास मंडळ.

# (सेवानिवृत्त होऊन) जाता राहिल कार्य काय...

हमें तो यही था गुरुर,
गम-ए- यार है हमसे दूर।
वही गम जिसे हमने
किस किस जतन से,
निकाला था इस दिलसे दूर।
वह चलकर कयामत कि चाल आ गया...

सेवानिवृत्तीच्या दिवशी मजरुह सुल्तानपुरी यांच्या मेरे हमदम मेरे दोस्त या चित्रपटातल्या 'हुई शाम उनका खयाल आ गया' या गाण्यातलं कडवं 'जॉली गुड फेलो' ट्युनसोबत वाजवावं. चित्रपटात जरी हे प्रेयसीच्या विरहामुळे नायकाच्या मनाची अवस्था व्यक्त करत असलं तरी चार्ज रिपोर्टवर सही करतानाच्या भावनांना सुध्दा चपखल बसतं.

कार्यालयाच्या उंबरठ्या समोर पुढच्या पर्वाच्या कृष्णविवराचं प्रवेशद्वार असतं. सेवानिवृत्तीला दुसऱ्या इनिंगची सुरुवात म्हणतात खरी परंतु वास्तविक पाहता ही आयुष्याच्या तिसऱ्या पर्वाची नांदी असते. कारण करियर सुरु होण्यापूर्वीच्या काळाचा सेवानिवृत्ती हा अॅंटी-क्लायमॅक्स असतो. टकमक टोकावरुन या कृष्णविवरात उडी घेणं अपरिहार्य असतं. सहकाऱ्यांकडे पाहताना आपल्या डोळ्यात 'मिच्छामी दुक्कडम" चे तर त्यांच्या डोळ्यात 'घालीन लोटांगण, वंदिन चरणा' नंतर विसर्जन झाल्याचे भाव असतात. आपल्यावर स्तुतिसुमने उधळणं सुरु असताना आपण अभिनंदनाच्या संदेशांवर ओझरते कटाक्ष टाकत असतो. मन 'बिते हुए दिनांना' मिस करत येणाऱ्या 'फुरसत'च्या दिनांचं काय करायचं या विवंचनेत असतं.

घर फुलांच्या सुगंधानं दरवळून गेलेलं असतं. अभिनंदनांचा वर्षाव चालूच असतो. शाली, श्रीफळं, सन्मानचिन्हं दिवाणखान्याची शोभा वाढवत असतात. अर्धांगिनी शालू सावरत पाणावलेल्या डोळ्याने स्मितहास्य करत आपल्याकडे आणि आपण तिच्या डोळ्यांपलिकडे शून्यात पाहात असतो. महत्वाच्या वस्तू पॅक करुन नंबर घालून ठेवलेले पुठ्ठ्यांचे बॉक्स इकडे तिकडे ठेवलेले असतात. घर इमिग्रेशन पूर्ण करुन वेटिंग रुममध्ये आल्यासारखं फिलिंग देत राहतं. बॉन व्होयाज...

चौदा वर्षे वनवास आणि त्यानंतर एक वर्ष अज्ञातवास. वनवास नाही म्हणता येणार परंतु अज्ञातवासाचं एक वर्ष सुरु होतं. साम्राज्य गेल्यामुळे मंजिलच्या शोधात निघालेल्या या हुमायुँचा नो मॅन्स लॅंड मधला प्रवास सुरु होतो. एके काळच्या युध्दनौकेचं हळू-हळू दिव्याची उघडझाप होणाऱ्या, इतरांना गाईड करण्यास सदैव तत्पर असलेल्या लाईट हाऊसमध्ये रुपांतर होतं. कामं सांगण्यासाठी वाजणारे नंबर कमी होत जातात आणि आपणही त्यांच्याकडे दुर्लक्ष करायला सुरुवात करतो. फिटनेस वॉकवेळी क्रॉस होणारे हाय करुन न थांबता पुढे जातात, कधी काळी ज्युनियर भेटले तर तुमच्या उजव्या बाजूने चालतात. ऑफिसमध्ये भेटायला गेलो तर निघताना खुर्चित उभे राहून हस्तांदोलन करुन रिडरला गाडीपर्यंत सोडायला सांगतात.

हळू हळू 'काहीही न करणं' हा पर्याय कसा योग्य राहिल हा विचार वर्ष संपता संपता आपल्या मनात येतो. राजाचं मारनं आणि पावसाचं झोडपणं झाल्या नंतर कुणालाही रिपोर्ट न करणं आणि त्याचबरोबर कुणालाही लॉंग टर्मसाठी कमिटमेंट न देणं ही बेजाबदारपणाची भावना वाढीस लागायला लागते. रिअल टाईम मध्ये जगण्यासाठी कसा संपूर्ण वेळ राखून ठेवता येईल, ही लाईफस्टाईल अंगीकारण्यासाठी आर्थिक विवंचना कशी दूर करता येईल याबाबत विचारमंथन सुरु होतं. तत्व असं की एकटेपणा आणि एकांत यामधला फरक लक्षात यायला लागतो. सकारात्मक स्वमग्नता येणं ही पुढची पायरी. आयुष्यभर जे काही नियोजन केलं त्यातलं किती वास्तवात आणता आलं याचा विचार केला तर नियोजन चुकणं हा अपवाद नसून नियमंच झाला होता असं वाटतं. आपल्या नियंत्रणात नसलेल्या हजारो घडामोडींच डायनॅमिक्स पाहता नियोजन केल्याप्रमाणे घडलं तर नवल. नियोजनशून्यतेमुळे काय होईल याची चाचपणी होते. नविन शोध लागतो कि केवळ पूर्व-पश्चिम-उत्तर-दक्षिण येवढंच ठरवून पुढं गेलं तरी कारवॉं तयार होत जातो.

उमेदवारीच्या काळातलं जिद्दीनं जगणं आणि वर्तमानातलं काहीही न करता जगणं यामधला फरक ठळकपणे जाणवतो. त्यावेळी ध्येयपूर्तीसाठी लागणारी ऊर्जा होती. बिकट परिस्थितीशी दोन हात करण्याची धमक होती. परंतु आर्थिक चणचण होती. त्याउलट आता फिरून त्याप्रमाणे जगायचा विचार केला तर पहिली जाणवणारी गोष्ट म्हणजे त्यावेळी स्वप्नात असलेल्या गोष्टी आता वास्तवात आलेल्या असतात. जाणिवेमुळे भौतिक गोष्टींबद्दलची ओढ लागत नाही. याचा परिणाम दातृत्वाची भावना थोडीफार जागृत होण्यात होतो. देवळात देणगीची पावती फाडली नाही तर अवघडल्यासारखं होतं. कुणी हात पसरला आणि सुटे पैसे असतील तर दिले जातात. कुणाला उधार देण्यापेक्षा देऊन टाकणं बरं वाटायला लागतं. जणूकाही बदली झाली आहे आणि सामानाची आवराआवर करताना बऱ्याच वस्तू देऊन टाकल्यावर क्लटर कमी झाल्यासारखं सारखं फिलिंग येतं.

असं राहायला सुरुवात केल्यानंतर समजतं कि नेटवर्किंग करण्याची काही आवश्यकता नाही. कारण आता आपलं कुणाकडे काही “काम” नसतं. जुनं ते सोनं समजून आयुष्यातल्या महत्वाच्या व्यक्ती कोण हे लक्षात येतं. कुटुंब किती महत्वाचं असतं याचा प्रत्यय यायला लागतो. नातवंडं हा आपला पुनर्जन्मचं जणू. मुलांना त्यांच्या जीवनशैलीबाबत टीका न करता आहेत तशी स्विकारली आणि फक्त मागतील तेंव्हा सल्ला देण्याचं धोरण ठेवलं तर पुढंचं सगळं सुकर होऊन जातं. आश्चर्याचा धक्का त्यावेळी बसतो ज्यावेळी सेवानिवृत्त झालेल्या इतर मित्रांचा ग्रूप पुन्हा पुनर्जिवित होतो आणि आपण बऱ्यापैकी बिझी होऊन जातो.

**या जगण्यावर, या जन्मावर,**
**शत:दा प्रेम करावे.**



जयंत नाईकनवरे
आय.पी.एस. (सेवानिवृत्त)

# जगभरातील समाजांना निसर्गाच्या संवर्धनासाठी प्रोत्साहित करणे!

## ‘आययूसीएन’चा स्थापना दिन

इंटरनॅशनल युनियन फॉर कॉन्झर्वेशन ऑफ नेचर (आययूसीएन) ही निसर्ग संवर्धन आणि नैसर्गिक संसाधनांच्या शाश्वत वापराच्या क्षेत्रात काम करणारी एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे. ५ ऑक्टोबर१९४८ मध्ये स्थापन झालेली आययूसीएन ही नैसर्गिक जगाची स्थिती आणि त्याचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक असलेल्या उपायांवर जागतिक प्राधिकरण बनली आहे. ती डेटा संकलन आणि विश्लेषण , संशोधन, क्षेत्रीय प्रकल्प, समर्थन आणि शिक्षण यामध्ये गुंतलेली आहे. आययूसीएनचे ध्येय जगभरातील समाजांना निसर्गाचे संवर्धन करण्यासाठी प्रभावित करणे, प्रोत्साहित करणे आणि मदत करणे आणि नैसर्गिक संसाधनांचा कोणताही वापर न्याय्य आणि पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत असेल याची खात्री करणे, हे आहे.

गेल्या काही दशकांमध्ये, आययूसीएनने आपले लक्ष संवर्धन पर्यावरणाच्या पलीकडे विस्तारले आहे आणि आता आपल्या प्रकल्पांमध्ये शाश्वत विकासाशी संबंधित मुद्यांचा समावेश करते. निसर्ग संवर्धनाच्या समर्थनासाठी जनतेला एकत्र आणण्याचे आययूसीएनचे स्वतःचे उद्दिष्ट नाही. माहिती आणि सल्ला देऊन, तसेच भागीदारी निर्माण करून सरकार, व्यवसाय आणि इतर भागधारकांच्या कृतींवर प्रभाव टाकण्याचा त्याचा प्रयत्न असतो. ही संस्था जगभरातील प्रजातींच्या संवर्धन स्थितीचे मूल्यांकन करणाऱ्या 'आययूसीएन रेड लिस्ट ऑफ थ्रेटन्ड स्पीशीज' संकलित आणि प्रकाशित करण्यासाठी सर्वसामान्यांमध्ये सर्वाधिक ओळखली जाते .

आययूसीएनमध्ये १७० हून अधिक देशांमधील १,४०० हून अधिक सरकारी आणि गैर-सरकारी संस्था सदस्य आहेत. सुमारे १६,००० शास्त्रज्ञ आणि तज्ञ स्वेच्छेने आययूसीएन आयोगांच्या कार्यात सहभागी होतात. ते ५० हून अधिक देशांमध्ये ९०० हून अधिक पूर्ण-वेळ कर्मचारी नियुक्त करते. त्याचे मुख्यालय ग्लॅंड, स्वित्झर्लंड येथे आहे . दर चार वर्षांनी, आययूसीएन जागतिक संवर्धन कॉंग्रेससाठी आययूसीएनचे आयोजन करते, जिथे आययूसीएन सदस्य शिफारसींवर मतदान करून जागतिक संवर्धन अजेंडा ठरवतात आणि ठराव व आययूसीएन कार्यक्रम मंजूर करून सचिवालयाच्या कार्याला मार्गदर्शन करतात.

आययूसीएनला संयुक्त राष्ट्रांमध्ये निरीक्षक आणि सल्लागार दर्जा आहे आणि ते निसर्ग संवर्धन आणि जैवविविधतेवरील अनेक आंतरराष्ट्रीय करारांच्या अंमलबजावणीत भूमिका बजावते. ते वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचर आणि वर्ल्ड कॉन्झर्वेशन मॉनिटरिंग सेंटरच्या स्थापनेत सहभागी होते. भूतकाळात, स्थानिक लोकांच्या हितापेक्षा निसर्गाच्या हिताला प्राधान्य दिल्याबद्दल आययूसीएनवर टीका झाली आहे. अलिकडच्या वर्षांत, व्यावसायिक क्षेत्राशी असलेल्या त्याच्या जवळच्या संबंधांमुळे वाद निर्माण झाला आहे.

आययूसीएनची स्थापना १९४८ मध्ये झाली. सुरुवातीला याला इंटरनॅशनल युनियन फॉर द प्रोटेक्शन ऑफ नेचर (१९४८-१९५६) म्हटले जात असे आणि पूर्वी हे वर्ल्ड कॉन्झर्वेशन युनियन (१९९०-२००८) म्हणूनही ओळखले जात होते. युनेस्कोचे पहिले महासंचालक ज्युलियन हक्सले यांनी आययूसीएनची स्थापना करण्याचा पुढाकार घेतला. आययूसीएनची स्थापना ५ ऑक्टोबर १९४८ रोजी प्रâान्समधील फॉन्टेनब्लू येथे झाली, जेव्हा युनेस्कोच्या प्रेरणेने विविध सरकारे आणि संवर्धन संस्थांच्या प्रतिनिधींनी 'इंटरनॅशनल युनियन फॉर द प्रोटेक्शन ऑफ नेचर'ची स्थापना करणाऱ्या एका औपचारिक अधिनियमावर स्वाक्षरी केली. ही नवीन संस्था स्थापन करण्याचा पुढाकार युनेस्कोकडून आणि विशेषतः त्याचे पहिले महासंचालक, ब्रिटिश जीवशास्त्रज्ञ ज्युलियन हक्सले यांच्याकडून आला होता. त्याच्या स्थापनेच्या वेळी, आययूसीएन ही निसर्ग संवर्धनाच्या संपूर्ण क्षेत्रावर लक्ष केंद्रित करणारी एकमेव आंतरराष्ट्रीय संस्था होती (पक्ष्यांच्या संरक्षणासाठी एक आंतरराष्ट्रीय संस्था, जी आता बर्डलाइफ इंटरनॅशनल आहे , १९२२ मध्ये स्थापन झाली होती).

आययूसीएन (इंटरनॅशनल युनियन फॉर कॉन्झर्वेशन ऑफ नेचर) ची सुरुवात ब्रुसेल्समध्ये ६५ सदस्यांसह झाली आणि ते युनेस्कोशी जवळून संबंधित होते. त्यांनी संयुक्तपणे न्यूयॉर्कमधील लेक सक्सेस येथे १९४९ ची निसर्ग संरक्षण परिषद आयोजित केली आणि अत्यंत धोक्यात असलेल्या प्रजातींची पहिली यादी तयार केली. आपल्या स्थापनेच्या सुरुवातीच्या काळात आययूसीएन जवळजवळ पूर्णपणे युनेस्कोच्या निधीवर अवलंबून होते आणि १९५४ मध्ये हा निधी अनपेक्षितपणे बंद झाल्यावर त्यांना आपले उपक्रम तात्पुरते कमी करण्यास भाग पडले. आययूसीएन प्रमुख शास्त्रज्ञांना सहभागी करून घेण्यात आणि वन्यजीवांवर कीटकनाशकांच्या हानिकारक परिणामांसारखे महत्त्वाचे मुद्दे ओळखण्यात यशस्वी झाले, परंतु त्यांनी विकसित केलेल्या अनेक कल्पना कृतीत उतरल्या नाहीत. सरकारांची कृती करण्याची अनिच्छा, आययूसीएनच्या आदेशाबद्दलची अनिश्चितता आणि संसाधनांची कमतरता यामुळे हे घडले. १९५६ मध्ये, आययूसीएनने आपले नाव बदलून इंटरनॅशनल युनियन फॉर कॉन्झर्वेशन ऑफ नेचर अँड नॅचरल रिसोर्सेस असे ठेवले.

सुरुवातीच्या काळात आययूसीएनच्या अनेक संवर्धन क्षेत्रीय प्रकल्पांचे केंद्रबिंदू आप्रिâका होता. आययूसीएनने संरक्षित क्षेत्र व्यवस्थापनाच्या 'येलोस्टोन मॉडेल'ला समर्थन दिले, ज्याने निसर्गाचे संरक्षण करण्यासाठी मानवी उपस्थिताr आणि क्रियाकलापांवर कठोर निर्बंध घातले. जागतिक सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारसा संरक्षणासंबंधी अधिवेशन (१९७२). आययूसीएनने युनेस्कोसोबत जागतिक वारसा अधिवेशनाचा सह-मसुदा तयार केला आणि सुरुवातीपासूनच निसर्गावरील अधिकृत सल्लागार मंडळ म्हणून सहभागी आहे.

रामसर करार – आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या पाणथळ जागांवरील करार (१९७५). सचिवालयाचे प्रशासन अजूनही आययूसीएनच्या मुख्यालयातून चालवले जाते.

जागतिक संवर्धनाचा नियमित आढावा घेण्यासाठी आययूसीएनने संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम सोबत एक करार केला. यातून मिळणारे उत्पन्न, डब्ल्यूडब्ल्यूएफ मार्फत मिळणाऱ्या वाढत्या महसुलासोबत मिळून, या संस्थेला १९४८ नंतर प्रथमच तुलनेने भक्कम आर्थिक स्थितीत आणले. याच काळात आययूसीएनच्या संवर्धनाच्या दृष्टिकोनात हळूहळू बदलाची सुरुवात झाली, ज्यामध्ये संस्थेने विकसनशील जगाला अधिक आकर्षित करण्याचा प्रयत्न केला.

## रिकाम्या पोटी तुपाचे सेवन

सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटी तुपाचे सेवन केल्याने आरोग्याला अनेक फायदे होतात. तूप हा आहाराचा भाग आहे. आपण तूप चपातीला लावून किंवा खिचडीवर घालून तुपाचे सेवन करतो. त्यामुळे जेवणाची चव वाढते, त्याच बरोबर अनेक आजारांवर देखील फायदेशीर आहे. जाणून घेऊया रिकाम्या पोटी तुपाचे सेवन केल्याने काय फायदे होतात.

» तुपाचे सेवन केल्याने पचनक्रिया सुधारते. जर पचनाशी संबंधित काही समस्या असतील तर सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटी तुपाचे सेवन करू शकता.

» रिकाम्या पोटी तुपाचे सेवन केल्याने अनेक आजारांशी संबंधित समस्या सुधारते. जर झोप न येणे, भूक न लागणे अशी लक्षणे दिसून आल्यास तुपाचे रिकाम्या पोटी सेवन करावे.

» सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटी तुपाचे सेवन केल्याने हाडे मजबूत होतात. सांधे दुखीवर लगेच आराम देखील मिळतो.

**संकलन : अनिल साखरकर**

# शहरात दुर्गा पूजेसाठी आवश्यक साहित्यांनी सजली बाजारपेठ

प्रतिनिधी ६ ऑक्टोबर



**अकोला:** शारदीय नवरात्री उत्सव रविवार, ११ ऑक्टोबरपासून सुरू होत आहे. नवरात्रीच्या तयारीसाठी अकोला शहर आणि इतर भागांमध्ये दुर्गा पूजेचे साहित्य विकणारी दुकाने सजली आहेत. नवरात्री उत्सवासाठी बाजारपेठांमध्ये पूजेच्या साहित्याची खरेदी सुरू झाली आहे. देवीच्या घटासाठी विधिवत पूजेसाठी लागणारे खण, साडी, बांगडी, ओटी तसेच घटाच्या पूजेसाठी पत्रावळी बाजारात विक्रीसाठी दाखल झाली आहेत. देवीच्या पूजेसाठी लागणाऱ्या वस्तू विकणाऱ्या दुकानांबाहेर लोकांची गर्दी दिसून येत आहे. यावर्षी, पूजेच्या साहित्यासोबतच, गेल्या वर्षीच्या तुलनेत मातीचे घट आणि बांगड्यांच्या किमतीही वाढल्या आहेत. घटस्थापनेसाठी वापरल्या जाणाऱ्या घटांच्या किमती वाढल्या. स्थानिक मोठ्या जैन मंदिराजवळील बाजारातील दुकानदाराने सांगितले की, गेल्या वर्षी सुमारे २० रुपयांना मिळणारे लहान मातीचे घट आता ३० रुपयांना विकले जात आहे. जे घट ५० रुपयांना होते, ते आता ७० रुपयांना विकले जात आहे आणि जे घट ७० रुपयांना होते, ते आता सुमारे १०० रुपयांना विकले जात आहे. त्याचप्रमाणे, बांगड्यांच्या दरातही वाढ झाली आहे. ज्या बांगड्या गेल्या वर्षी २० रुपये प्रति डझन दराने विकल्या जात होत्या, त्या आता सुमारे ३० रुपये प्रति डझन दराने विकल्या जात आहेत. गांधी चौकातील आणखी एका विक्रेत्याने पूजेच्या सामानाच्या दरात १०% वाढ झाल्याचे सांगितले. दुकानदारांच्या मते, नवरात्रीदरम्यान वाढलेल्या मागणीमुळे पूजेचे साहित्य आणि मेकअपच्या सामानाच्या किमती वाढल्या आहेत. माता राणीला अर्पण केल्या जाणाऱ्या चुनरीची किंमत देखील तिच्या आकार आणि गुणवत्तेनुसार बदलते. लहान चुनरी सुमारे ५ रुपयांपासून ते ५० रुपयांपर्यंत उपलब्ध आहे. मोठी चुनरी ५० रुपयांपासून पुढे २०० रुपयांपर्यंत उपलब्ध आहे. येत्या काही दिवसांतही खरेदीत वाढ होण्याची शक्यता दुकानदारांना आहे. दुकानदारांनी बाजारातही अशाच किमती असल्याचे सांगितले आहे.

## हिंगोलीत अग्नितांडव,तीन जणांचा मृत्यू



प्रतिनिधी ६ ऑक्टोबर

**हिंगोली:** शहरातील मारवाडी गल्ली परिसरात एका घरात साठवलेल्या फटाक्यांच्या साठ्याने पेट घेतल्यामुळे झालेल्या स्फोटमध्ये तीन जणांचा मृत्यू तर किमान 15 जण जखमी झाल्याची माहिती प्राथमिक दृष्ट्या समजली आहे.

हिंगोली शहरातील कपडा गल्ली मारवाडी गल्ली परिसरात एका घरामध्ये अवैधरित्या मोठ्या प्रमाणात फटाक्यांचा साठा करण्यात आला होता. सायंकाळी सात ते साडे सातच्या दरम्यान सदरील फटाक्याच्या साठ्यांना आग लागली. आग लागल्यानंतर फटाक्यांनी रौद्ररूप धारण केले. ज्यामुळे आजूबाजूच्या अनेक घरांना आग लागली. या दरम्यान अनेकांनी आग विझवण्यासाठी प्रयत्न केला. या व्यतिरिक्त काही जणांनी आजूबाजूच्या घरामधील गॅस सिलेंडर बाहेर काढून ठेवले. यादरम्यान आगीने मोठे रौद्ररूप धारण केले. ज्यामध्ये दोन व्यक्तींचा मृत्यू झाला. या व्यतिरिक्त अन्य एका व्यक्तीचा समावेश असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. मृत व्यक्तींच्या व्यतिरिक्त अन्य 15 जण यामध्ये जखमी असून त्यातील अग्निशामक दलाचे कर्मचारी हे देखील गंभीरित्या भाजले असून त्यांना नांदेड येथे हलविण्यात आले आहे. अद्याप पर्यंत मृत व्यक्तींचा आकडा समजला नाही. या प्रकरणात मृतांची माहिती आणि आकडेवारी वाढण्याची शक्यता वर्तवली जाते आहे. दरम्यान रहिवासी भागामध्ये फटाक्यांचा साठा कसा काय करण्यात आला यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान जिल्हा सामान्य रुग्णालयात वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता मुंगल यांनी भेट देऊन माहिती घेत दोन मृतांची अधिकृत आकडेवारी जाहीर केली आहे शिवाय खाजगी दवाखान्यातून पाठवण्यात आलेल्या रुग्णांची माहिती जवळपास 15 च्यावर जखमी असल्याची कळत आहे.

## बोगस डॉक्टरांवर पोलिसांचा दणका

प्रतिनिधी ६ ऑक्टोबर

**अकोट :** वैद्यकीय पात्रता व नोंदणी नसताना रुग्णांवर उपचार करणाऱ्या दोन बोगस डॉक्टरांविरुद्ध अकोट शहर व ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण चव्हाण यांच्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली. अकोट शहरातील समर्थ संकुल परिसरात डॉ. विजय मनोहर ताडे हे आवश्यक शैक्षणिक पात्रता व वैद्यकीय नोंदणी नसताना वैद्यकीय व्यवसाय करीत असल्याचे तपासणीत आढळून आले. याप्रकरणी अकोट शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. तसेच डॉ. जोहेब अशरब लदीद पटेल यांनी वैद्यकीय पात्रता, वैध नोंदणी व वैद्यकीय व्यवसायाचा कायदेशीर अधिकार दर्शविणारी कागदपत्रे सादर न केल्याने त्यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला.

## महापालिकेतील भाजप सरकारच्या कारभारावर डॉ. झीशान हुसेन भडकले

प्रतिनिधी ६ ऑक्टोबर

**अकोला:** अकोला महापालिकेतील भाजप सरकार आणि प्रशासनाच्या अपयशी नियोजनामुळे शहरात पुन्हा टँकर राज आणण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा घणाघाती आरोप विरोधी पक्षनेते डॉ. झीशान हुसेन यांनी केला आहे.



अकोला महापालिकेतील विरोधी पक्षनेते डॉ. झीशान हुसैन यांनी भाजप सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. सत्ताधारी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या शून्य नियोजनामुळे शहरावर पाण्याचे भीषण संकट ओढावल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गेल्या अनेक वर्षांपासून मोर्णा आणि काटेपूर्णा प्रकल्पांना जोडणे तसेच वान धरणावरून पाइपलाइन आणण्याच्या योजना प्रलंबित ठेवण्यात आल्या. आता पाऊस कमी झाल्याचे कारण पुढे करून प्रशासनाकडून नवीन वल्गना केल्या जात आहेत. सत्ताधारी पक्ष केवळ आपल्या मर्जीतील कंत्राटदारांना टँकरचे ठेके देऊन स्वतःचे खिसे भरण्याचे काम करत असल्याचा गंभीर आरोप करत त्यांनी अकोलेकरांना या अपयशी धोरणाविरोधात जागरूक राहण्याचे आवाहन केले आहे. आज महापालिकेत सत्तारुढ पक्षाने नगरसेवकांना प्रभागातील पाणी समस्यांबाबत अवगत करण्याची संधी दिली होती. महापालिकेतील विरोधातील काँग्रेस नगरसेवकांनी सत्तारुढ पदाधिकाऱ्यांची एकत्र भेट घेत मनपा प्रशासनाच्या उपाययोजनांबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.

## खंडेलवाल भवनात गोदरेज कंपनीच्या उत्पादनांचे शानदार प्रदर्शन

प्रतिनिधी ६ ऑक्टोबर

**अकोला.** येथील खंडेलवाल भवनमध्ये जगप्रसिद्ध गोदरेज कंपनीच्या विविध नवनवीन उत्पादनांचे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन अकोला पूर्वचे लोकप्रिय आमदार श्री. रणधीर सावरकर यांच्या शुभहस्ते पार पडले. याप्रसंगी मित्तल इलेक्ट्रॉनिक्सचे रामजी मित्तल विशेष म्हणून उपस्थित होते.



अकोला शहरातील खंडेलवाल भवन येथे आयोजित या भव्य प्रदर्शनात जगप्रसिद्ध गोदरेज कंपनीची आधुनिक तंत्रज्ञानावरील नवीन उत्पादने प्रदर्शित करण्यात आली आहेत. या विशेष कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अकोला पूर्वचे लोकप्रिय आमदार रणधीर सावरकर जी उपस्थित होते; त्यांनी दीपप्रज्वलन करून प्रदर्शनाचे औपचारिक उद्घाटन केले.

हे प्रदर्शन प्रामुख्याने बीटूबी (बिझनेस टू बिझनेस) म्हणजेच व्यावसायिक व्यवहारांवर केंद्रित होते, ज्यामध्ये अकोल्यातील अनेक प्रमुख इलेक्ट्रॉनिक्स व्यापाऱ्यांनी सहभाग घेतला. या प्रसंगी मित्तल इलेक्ट्रॉनिक्सचे श्री. रामजी मित्तल यांचीही विशेष उपस्थिती होती.

या कार्यक्रमात गोदरेज कंपनीतर्फे सादर करण्यात आलेल्या अत्याधुनिक फ्रिज आणि वॉशिंग मशिनसह विविध उत्पादनांच्या नवीन रेंजला व्यापाऱ्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला. एकाच छताखाली ग्राहकांना गोदरेज कंपनीचे जगप्रसिद्ध फ्रिज, वॉशिंग मशिन आणि इतर इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंची अथांग श्रेणी उपलब्ध करून देण्यात आली असून, याचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## पाच लाखांचा अस्वच्छ मिठाई साठा केला जप्त मोठी कारवाई

प्रतिनिधी ६ ऑक्टोबर

**अकोला.** अकोल्यातील रायलीजिन परिसरातील ट्रान्सपोर्टवर अन्न व औषध प्रशासनाने धाड टाकून गुजरातवरून अस्वच्छ वातावरणात आणलेला लाखो रुपयांचा बनावट मिठाईचा साठा जप्त करत तीन व्यापाऱ्यांचे परवाने तात्काळ निलंबित केले आहेत. रायलीजिन भागातील एका ट्रान्सपोर्टवर मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने धाड टाकली. या तपासणीदरम्यान अहमदाबाद गुजरातवरून दोन ट्रकद्वारे आणलेला मिठाईचा मोठा साठा आढळून आला. यामध्ये विविध प्रसिद्ध ब्रँडचा स्वीट हलवा, ट्रॅडिशनल स्वीट, रिच स्वीट आणि ब्रजनिधी तसेच मुरलीधर स्वीटचा समावेश होता. हा संपूर्ण साठा अत्यंत अस्वच्छ आणि अनारोग्यदायी स्थितीत वाहतूक करून आणला गेला होता. अधिकाऱ्यांनी या अन्नपदार्थांचे अन्न नमुने प्रयोगशाळेतील तपासणीसाठी घेतले आहेत. उर्वरित सर्व साठा जप्त करण्यात आला असून तो महापालिकेच्या भोड येथील कचरा प्रक्रिया आणि बायो गॅस प्रकल्पात नष्ट केला जाणार आहे. नियमबाह्य आणि आरोग्यास घातक माल मागवणाऱ्या कमल शर्मा, वैभव पाटील आणि अशोक अहुजा या तीन व्यापाऱ्यांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा पथकाने ही कारवाई केली असून यामुळे भेसळयुक्त माल विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.













सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

मंगळवार दि. ६ ऑक्टोबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com







# मतदानापूर्वी गावकऱ्यांपुढे हात जोडले, निवडून येताच सरपंच गाव लुटत सुटले!

## * सरपंच बेईमान; ४० हजारांसाठी विकले सरपंचाने इमान
## * कसे होईल विकास काम विकासकामातूनच मागतो दाम

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

मतदानापूर्वी गावकऱ्यांसमोर हात जोडून मतांची विनंती, मात्र निवडून आल्यानंतर विकासकामांच्या निधीतूनच पैशांची कथित मागणी केल्याची ऑडिओ क्लिप ने खळबळ उडाली आहे, पैशाच्या मागणीची क्लिप समोर आल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची चर्चा आहे. मतदानापूर्वी आपल्या पुढे हात जोडले आणि आता आपले गावच लुटत सुटले. विकास करतील म्हणून निवडून दिले मात्र विकास कामातून चाळीस हजाराचे मागतो दाम तर, मग गावात कसे होईल विकास काम, अशी चर्चा सध्या गावात सुरू आहे,

केनवड पासून जवळ असलेले एका गावातील शाळेसाठी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी आलेल्या निधीतून १ लाख दहा हजार रु रुपयाच्या विकास निधीमधून मला चाळीस हजार द्या तरच काम करा अशा वक्तवाची ऑडिओ क्लिप समोर आली आहे. यात सरपंचानी ४० हजार रुपयांची कथित



मागणी केल्याचा आरोप असून, 'विकासकाम करायचे असेल तर मला मागच्या कामात काही भेटले नाही मला या कामातून चाळीस हजार रुपये द्या, मग आता प्रश्न उपस्थित होत आहे सरपंच विकास कामासाठी निवडून दिला की आपले स्वतःचे घर भरण्यासाठी असा थेट सवाल आता ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

विकासकामातून ४० हजार रुपयांच्या कथित मागणीचा आरोप समोर आल्यानंतर ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांच्या शाळेच्या विकासासाठी आलेल्या निधीतून कथित पैशांची मागणी होत असल्याचा आरोप असल्याने या निधीचा नेमका वापर कसा झाला, याची चौकशी करण्याची मागणी होत आहे.'कसे होईल विकास काम? विकासकामातूनच मागतो दाम!' असा सवाल उपस्थित करत ग्रामस्थांनी विकासकामांचा निधी, मंजुरी, अंदाजपत्रक, मोजमाप, प्रत्यक्ष कामाची गुणवत्ता आणि देयकांची सखोल तपासणी करण्याची मागणी केली आहे.या कथित ४० हजारांच्या मागणीसंदर्भात ऑडिओ क्लिप असल्याचा दावा करण्यात येत आहे. संबंधित ऑडिओची सत्यता, आवाज आणि संपूर्ण संभाषणाचा संदर्भ यांची तांत्रिक पडताळणी झाल्यानंतरच त्यातील वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे. दरम्यान, घरकुल योजनेबाबतही लाभार्थ्यांकडून २०-२० हजार रुपये घेतल्याचे कथित आरोप यापूर्वी समोर आले आहेत. त्यामुळे विकासकामे आणि घरकुल योजनेतील आर्थिक व्यवहारांची एकत्रित चौकशी करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.४० हजारांच्या कथित मागणीमागे नेमके सत्य काय? विकासकामाच्या निधीतून कोणाकडून, कशासाठी आणि कोणाच्या सांगण्यावरून पैसे मागितले गेले? या प्रश्नांची उत्तरे अधिकृत चौकशीतून समोर येणे आवश्यक आहे.आरोप सिद्ध झालेले नसून, संबंधित सरपंचाची बाजू आणि ऑडिओ क्लिपची तांत्रिक सत्यता अधिकृत चौकशीनंतरच स्पष्ट होईल. दोष आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.



### चेतनची गावात दादागिरी; घरकुल लाभार्थ्यांकडून वसुली भारी.. सरपंच, उपसरपंच, सदस्य, सचिव सर्वांचीच साथेदारी

घरकुलाचा लाभ मिळवून देण्याच्या नावाखाली लाभार्थ्यांकडून २०-२० हजार रुपये घेतल्याचे कथित आरोप समोर आले आहेत. पैसे न दिल्यास हप्ता थांबवण्याची कथित धमकी दिल्याचाही दावा करण्यात येत आहे. यात सरपंच नव्हे तर सर्वच यंत्रणा साथीदार असल्याचे गावात बोलल्या जात आहे, या गावातील सर्व विकास कामा ची या संपूर्ण प्रकाराची सखोल चौकशी करून नेमकी साथेदारी कोणाची, याचा छडा लावावा आणि दोष आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## थोडक्यात

### पार्वताबाई दशरथ नाईकवाडे यांचे वृद्धापकाळाने निधन

**पिंप्री (सरहद्द :** येथील पार्वताबाई दशरथ नाईकवाडे यांचे रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी साडेआठ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय अंदाजे ८० ते ८५ वर्षे होते.पार्वताबाई यांनी आयुष्यभर कष्टातून



संसाराचा गाडा चालवत मुलं, नातवंडे आणि मोठा परिवार सांभाळला. सुमारे दहा वर्षांपूर्वी पतीचे निधन झाल्यानंतर कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर आली. त्यानंतर त्यांच्या डोळ्यांदेखत दोन मुले, एक मुलगी आणि एका नातवाचे निधन झाले. एवढ्या दुःखद प्रसंगांनंतरही धीर न सोडता त्यांनी संपूर्ण कुटुंबाला आधार देत एकत्र ठेवले.त्यांच्या प्रेम, माया आणि संस्कारामुळे नाईकवाडे परिवार गावात एकसंध व आदर्श कुटुंब म्हणून ओळखला जातो. त्यांच्या निधनाने परिवारावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातवंडे व मोठा आप्तपरिवार आहे.रक्षाविसर्जन कार्यक्रम बुधवार, दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता, पिंप्री (सरहद्द) येथील राहत्या घरी आयोजित करण्यात आला आहे.

## निधन वार्ता...

### प्रा.किरणकुमार वाळली

**अनसिंग :** येथील स्यादवाद एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त तथा निवृत्त प्राध्यापक किरणकुमार विजयकुमार वाळली



यांचे रविवार ४ ऑक्टोबर २०२६ रोजी निधन झाले.ते ७२ वर्षाचे होते. रविवारी सकाळी ११ वाजता येथील शृंगरूषी मोक्षधाम मध्ये त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, जावई,तिन भाऊ , नातू असा आप्त परिवार आहे.

# (MR) च्या विकृतीची हद्द, शाळकरी मुलीचे गुपचूप चित्रीकरनातून सिद्ध !

## पोलिसांनी गुन्हा दाखल केला खुद्द

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शहरातील एका नामांकित मुलींच्या शाळेत सोमवारी, ५ ऑक्टोबर रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास समाजाला काळिमा फासणारी अत्यंत गंभीर आणि संतापजनक घटना घडली. शाळेतील स्वच्छतागृहात एका २४ वर्षीय तरुणाने मोबाईलद्वारे मुलीचे गुपचूप आक्षेपार्ह चित्रीकरण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या विकृत कृत्यामुळे शैक्षणिक वर्तुळात आणि नागरिकांमध्ये प्रचंड खळबळ उडाली असून, वाशिम शहर पोलिसांनी या प्रकरणी आरोपीला तत्काळ




बेड्या ठोकल्या आहेत.

शाळेच्या शेजारीच एका इमारतीचे बांधकाम सुरू आहे. तेथे काम करणाऱ्या मजुरांच्या सतर्कतेमुळे हा विकृत प्रकार वेळेत उघडकीस आला. हा तरुण मुलींच्या स्वच्छता गृहाजवळ अत्यंत संशयास्पद हालचाली करत मोबाईलद्वारे चित्रीकरण करत असल्याचे मजुरांच्या निदर्शनास आले. घटनेचे गांभीर्य ओळखून मजुरांनी जराही वेळ न दवडता थेट शाळेच्या मुख्याध्यापकांकडे धाव घेऊन या प्रकाराची माहिती दिली.मुख्याध्यापकांनी तातडीने वाशिम शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच वाशिम शहर पोलिसांचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि आरोपीला तत्काळ ताब्यात घेतले.पंकज चंद्रशेखर लांजेवार (वय २४ वर्षे, रा. वेणी गणेशपूर, ता. नंदगाव खंडेश्वर, जि. अमरावती) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तो वैद्यकीय प्रतिनिधी (मेडिकल रिप्रेझेंटटिव्ह) म्हणून काम करतो. याप्रकरणी वाशिम शहर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये (पॉक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### वाशीम तहसीलमध्ये महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोक अदालत !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानुसार राबविण्यात येत असलेल्या महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोक अदालत अभियानांतर्गत आज दि.५ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालय, वाशिम येथील सभागृहात महसूल लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले. उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या लोक अदालतीत विविध स्वरूपाची एकूण ४८ प्रकरणे सुनावणीसाठी ठेवण्यात आली होती.

सुनावणीदरम्यान संबंधित पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेण्यात



आले.

परस्पर सामंजस्य व तडजोडीने प्रकरणे निकाली काढण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात आली. सुनावणीअंती एकूण ९ प्रकरणांमध्ये तडजोड घडवून आणण्यात यश आले. यामध्ये रस्त्याबाबतची ४ प्रकरणे आणि इतर जमिनीच्या वादासंबंधी ५ प्रकरणांचा समावेश आहे.या ९ प्रकरणांमध्ये संबंधित पक्षकारांमध्ये सामंजस्य व तडजोड घडवून आणून प्रकरणे निकाली काढण्यात आली .

### सरपंच पदाच्या सुधारित आरक्षणाची सोडत ८ व ९ ऑक्टोबरला

**वाशीम :** जिल्ह्यातील सरपंच पदाचे आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त झाल्यामुळे सरपंच पदाच्या आरक्षणामध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. याबाबत ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी निर्देश दिले आहेत.दिनांक १३ जून २०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या सरपंच पदाच्या आरक्षणामध्ये कोणताही बदल करण्यात येणार नाही. नागरिकांचा मागास प्रवर्ग व खुला प्रवर्ग (महिलांसह) यांच्या आरक्षणामध्ये बदल होत असल्याने दिनांक १२ ऑगस्ट २०२६ रोजीच्या शुद्धीपत्रकान्वये या दोन्ही प्रवर्गांचे सुधारित आरक्षण महिलांसह निश्चित करण्यात येणार आहे. तसेच नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे प्रवर्गनिहाय आरक्षण महिलांसह निश्चित करण्यासाठी सोडत घेण्यात येणार आहे.

# शौचालयाचे काम पूर्ण करण्यास नकार !

## नगरसेवकाची थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

● राहुल जुमडे @ रिसोड ●

वाशिम शहरातील प्रभाग क्र. ०९ मधील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील सार्वजनिक शौचालयाच्या दुरुस्तीचे काम सहा महिने उलटूनही पूर्ण झाले नसल्याचा आरोप करत नगरसेवक शेख रशीद उर्फ नूर शेख शहानुर यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे. संबंधित कंत्राटदार नंदिनी एंटरप्राइजेस यांना काळ्या यादीत समाविष्ट करून उर्वरित काम दुसऱ्या सक्षम कंत्राटदारामार्फत पूर्ण करून घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

वाशिम शहरातील प्रभाग क्रमांक ०९ मधील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील सार्वजनिक शौचालयाच्या दुरुस्तीच्या कामाबाबत नागरिकांच्या गैरसोयीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. नगरसेवक शेख रशीद (नूर) शेख शहानुर यांनी जिल्हाधिकारी वाशिम यांना दिलेल्या निवेदनात संबंधित कंत्राटदाराविरोधात कारवाईची मागणी केली आहे. निवेदनानुसार, सार्वजनिक शौचालयाच्या दुरुस्तीचे काम १८ मार्च २०२६ रोजी नंदिनी एंटरप्राइजेस या कंत्राटदाराला देण्यात आले होते. काम पूर्ण करण्याची मुदत ३० दिवस होती. कामाची सुरुवात करण्यात आली असली तरी सहा महिने उलटूनही अर्ध्याहून अधिक काम



अपूर्ण अवस्थेत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित कंत्राटदाराला वारंवार सूचना व पाठपुरावा करूनही उर्वरित काम पूर्ण करण्यात आले नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

काम रखडल्यामुळे परिसरातील नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच महिलांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. शौचालयातील आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाल्याचेही निवेदनात म्हटले आहे.याप्रकरणी संबंधित कंत्राटदाराने दिलेल्या



मुदतीत काम पूर्ण न केल्यामुळे व कामात निष्काळजीपणा दाखवल्यामुळे नियमानुसार कारवाई करण्यात यावी तसेच नंदिनी एंटरप्राइजेस यांना काळ्या यादीत समाविष्ट करून उर्वरित काम दुसऱ्या सक्षम कंत्राटदाराकडून तातडीने पूर्ण करून घ्यावे, अशी मागणी नगरसेवक शेख रशीद ( नूर ) शेख शहानुर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.या निवेदनाच्या प्रती पालकमंत्री दत्तात्रेय भरणे तसेच मुख्याधिकारी, नगर परिषद वाशिम यांनाही देण्यात आल्या आहेत.

# महावितरणकडून खासगी वाहनांचा व्यावसायिक वापर !

## वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप; संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची धनंजय रणखांब यांची मागणी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

महावितरणच्या वाशीम विभागात काही खासगी वाहनांचा व्यावसायिक कामासाठी वापर केला जात असल्याचा आरोप करत, या वाहनांची प्रादेशिक परिवहन विभागामार्फत तपासणी करून जप्तीची कारवाई करावी, तसेच नियमबाह्य पद्धतीने खासगी वाहनांना कामासाठी परवानगी देणाऱ्या संबंधित महावितरणच्या अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष धनंजय रणखांब यांनी प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

धनंजय रणखांब यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महावितरणच्या वाशीम विभागातील संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रादेशिक परिवहन वाहन कायद्याचे उल्लंघन करून काही एजन्सींना व्यावसायिक कामासाठी खासगी वाहनांच्या वापराचे वर्क ऑर्डर मंजूर करण्यात आले आहेत. मोटार वाहन कायदा १९८८ मधील कलम ६६, ३९ व १९२ नुसार शासकीय किंवा निमशासकीय कामासाठी व्यावसायिक परवाना असलेल्या वाहनांचाच वापर करणे बंधनकारक असल्याचा दावाही या निवेदनात करण्यात आला आहे.

मात्र, महावितरणच्या कामासाठी खासगी पासिंग असलेली वाहने वापरली जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यामध्ये एमएच २७ एआर ३१२६ (टाटा सुमो), एमएच ०४ एचवाय १७८५ (टाटा झेस्ट), एमएच ३४एए ३५१६ (बोलेरो), एमएच १४ एफसी ०४४५ (इंडिका व्हिस्टा), एमएच ३० एएफ ३००५ (टाटा सुमो), एमएच ४० वाय ६४८० (टाटा सुमो), एमएच ३७बी ६९४४ (टाटा सुमो) आणि एमएच ३८ ०९०६ (बोलेरो) या वाहनांचा समावेश असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या सर्व वाहनांची आरटीओ पासिंग स्थिती 'एलएमव्ही' असल्याचे निवेदनासोबतच्या यादीत दाखविण्यात आले आहे. खासगी वाहनांचा



अशा प्रकारे व्यावसायिक वापर झाल्यास शासनाचा महसूल बुडण्यासोबतच अपघात किंवा अन्य आपत्कालीन परिस्थितीत संबंधित वाहनांना व्यावसायिक विम्याचे संरक्षण मिळण्याबाबत अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे प्रवासी तसेच महावितरणच्या कर्मचाऱ्यांच्या जीवितालाही धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे या निवेदनात धनंजय रणखांब यांनी स्पष्ट केले आहे. महावितरणच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करून केवळ संबंधित एजन्सीला आर्थिक फायदा मिळवून देण्याच्या उद्देशाने वर्क ऑर्डर दिल्याचा संशयही धनंजय रणखांब यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे निवेदनात नमूद केलेल्या वाहनांची प्रादेशिक परिवहन विभागामार्फत तातडीने प्रत्यक्ष पडताळणी करून ती जप्त करावीत, तसेच खासगी वाहनांचा व्यावसायिक कामासाठी वापर करण्यास मंजुरी देणाऱ्या महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी आणि संपूर्ण प्रकरणाचा अहवाल महावितरणच्या मुख्य कार्यालयाकडे पाठवावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनासोबत संबंधित वाहनांची माहिती तसेच महावितरणकडून देण्यात आलेल्या वर्क ऑर्डरसह उपलब्ध कागदपत्रे जोडल्याचेही धनंजय रणखांब यांनी नमूद केले आहे.

# चित्र ऋषी वृद्धाश्रमात ज्येष्ठ नागरिक दिन

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरुळपिर लगत असलेले चित्रऋषी महाराज वृद्धाश्रम तुळजापूर येथे १ आक्टोंबर २०२६ रोजी जेष्ठ नागरिक दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी युवा कार्ये व क्रीडा.मंत्रालय भारत सरकार च्या आरुषी मॅडम आय.ए.एस जिल्हा युवा अधिकारी भारत अभियान वाशिम, हीं.एम लाकडे गृहपाल, स्वाती.अकोलकर अधीक्षिका शासकीय निवासी मुलींचे वस्तीगृह मंगरूळपीर हे प्रमुख उपस्थित होते

विद्यालयाचे प्राचार्य अभिजीत राठोड कार्यक्रम अध्यक्ष म्हणून होते. आरुषी अभिजीत राठोड यांनी गेल्या ३७ वर्षापासून वृद्धाश्रमा मार्फत ज्येष्ठ नागरिकांसाठी देण्यात येणाऱ्या सुख सुविधा व संस्थेमार्फत इतर सामाजिक कार्य बद्दल सविस्तर माहिती दिली .



आरुषी मॅडम व सरस्वती समाजकार्य महाविद्यालय वाशिम येथील विद्यार्थिनी आकांक्षा गायकवाड , अंजली इंगोले, दीक्षा भगत यांनी वृद्धाश्रमातील वृद्धां सोबत सामूहिक संवाद साधला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सरपाते यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री एस सी चव्हाण यांनी केले. या कार्यक्रमाला निलेश खोराने युवा भारत अभियान आणि श्री अनिल चव्हाण ,नारायण गिरी आदि सर्व विद्यालयातील कर्मचाऱ्यांची व विद्यालयातील दिव्यांग विद्यार्थी उपस्थिती लाभली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय नविन नगर परिषद कॉम्प्लेक्स, रविवार बाजार, वाशिम जि. वाशिम येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135